**कृपया प्रसिध्दीसाठी** **16 मे 2009**

## राम नाईक यांनी मतदारांचे आभार मानले.

**मुंबई, शनिवार :** भाजपा-शिवसेना युतीचे उत्तर मुंबई लोकसभा मतदारसंघातील उमेदवार श्री. राम नाईक यांनी आपला पराभव स्वीकारत असतानाच त्यांना मतदान करणा-या सर्व मतदारांचे तसेच भाजपा-शिवसेना युतीच्या कार्यकर्त्यांचे तसेच सामाजिक कार्यकर्त्यांचे आभार मानले आहेत.

''तिस-या क्रमांकावरील महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे उमेदवार श्री. शिरिष पारकर यांनी 1,47,502 मते घेतली आहेत. अवघ्या 5,779 मतांनी पराभव झाला असला, तरी तो पराभवच आहे. त्याचा मी स्वीकार करतो. माझे जनसेवेचे व्रत अविरत सुरुच राहील'', अशी प्रतिक्रिया यावेळी श्री. नाईक यांनी व्यक्त केली आहे.

**(विनोद शेलार)**
**प्रसिध्दी प्रमुख**
**भ्रमणध्वनी: 9867689540**